महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
मुंबई विभागीय मंडळ, वाशी, नवी मुंबई-400 703.
Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education,
Mumbai Divisional Board, Vashi, Navi Mumbai-400 703.

परीक्षा प्राधान्य / गोपनीय / अत्यंत महत्वाचे

क्र. मुंविमं/कें.नि./२०२६/ २२१
वाशी, नवी मुंबई ४००७०३
दिनांक २२/०१/२०२६

प्रति,

१) मा.पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई,
२) मा.पोलीस आयुक्त, ठाणे शहरी विभाग, ठाणे.
३) मा.पोलीस आयुक्त, बेलापूर, नवीमुंबई.
४) मा. पोलीस अधिक्षक, ठाणे ग्रामीण विभाग, ठाणे.
५) मा.पोलीस अधिक्षक, अलिबाग, जिल्हा रायगड.
६) मा.पोलीस अधिक्षक, पालघर, जिल्हा पालघर,

विषय:- फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षांच्या कालावधीत परीक्षा केंद्र, उपकेंद्र व परिरक्षक केंद्रावर पोलीस बंदोबस्त पुरविणेबाबत...

संदर्भ :- १. मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे जा.क्र.प्रवेश-२०१८/प्र.क्र.64/एसडी-२, दिनांक निरंक रोजीचे पत्र.
२. राज्यमंडळ पुणे यांचे क्र.रा.मं./ परीक्षा – २/४३९७, दि. १२/१२/२०२५ रोजी चे पत्र.
३. राज्यमंडळ पुणे यांचे क्र.रा.मं./ परीक्षा – २/१६८, दि. १६/०१/२०२६ रोजी चे पत्र.

महोदय,

उपरोक्त विषयानुसार आपणास कळविण्यात येते की, फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये इ. १० वी व इ.१२ वी च्या परीक्षा खालील कालावधीमध्ये आयोजित करण्यात आलेल्या आहेत.

१) उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.१२ वी) दि. १० फेब्रुवारी, २०२६ ते दि. १८ मार्च, २०२६.

२) माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (इ.१०वी) दि. २० फेब्रुवारी, २०२६ ते दि. १८ मार्च, २०२६.

सदर परीक्षा कालावधीत सर्व परीक्षा केंद्र, उपकेंद्र व परिरक्षक केंद्रावर पोलीस बंदोबस्त आवश्यक आहे. परीक्षेसाठी पोलीस बंदोबस्त उपलब्ध करून देणेबाबत उपरोक्त संदर्भाधीन पत्रान्वये मा.प्रधान सचिव, शालेय शिक्षण व कीडा विभाग यांनी मा. अपर मुख्य सचिव, गृह विभाग व मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना कळविलेले आहे.

आपल्या कार्यकक्षेतील ज्या शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांची परीक्षा केंद्र म्हणून निवड करण्यात आलेली आहेत त्या पैकी मुख्य परीक्षा केंद्रांवर (Main Centre) हत्यारी पोलीस किमान दोन लाठीधारी पोलीस शांतता व सुव्यवस्था राखण्याचे दृष्टीने परीक्षा सुरु होण्याच्या एक दिवस अगोदर पासून नियुक्त करून त्या केंद्राचे ठिकाणी परीक्षा संपेपर्यंत पोलीस बंदोबस्त ठेवण्यात यावा. सदर परीक्षा केंद्रांवर रात्रीच्या पहाऱ्याची आवश्यकता नाही. मात्र मुख्य परीक्षा केंद्रांवर सकाळी ८.०० वाजता व उपकेंद्रांवर सकाळी ९.३० वाजल्यापासून सायंकाळी ८.०० वाजेपर्यंत पोलीस बंदोबस्त ठेवावा. तसेच प्रत्येक परीक्षा केंद्रांवर किमान एक महिला पोलीस ठेवावी. परीक्षेच्या कालावधीत परीक्षा केंद्रावर विद्यार्थिनींना परीक्षागृहात प्रवेश देण्यापूर्वी झडती घेण्यासाठी महिला पोलीसाची नियुक्ती करण्यात यावी. प्रत्येक केंद्रावर गतवर्षी काम केलेल्या व्यतिरिक्त दुसरे पोलीस बंदोबस्तासाठी नियुक्त करण्यात यावेत.

आवश्यकतेनुसार परीक्षा केंद्रांचे ठिकाणी मुंबई पोलीस कायदा कलम ३७ (१) (३) आणि कलम १४४ लागू करण्यात तसेच यावे ही विनंती. केंद्राच्या परिसरातील झेरॉक्स मशीन, फॅक्स मशीन, पेजर, लॅपटॉप, मोबाईल फोन, आयपॅड व तत्सम साधनांच्या वापरावर प्रतिबंध आणि एस. टी. डी. बुथवरही लक्ष ठेवण्याबाबत तसेच परिरक्षक केंद्रासाठी हत्यारी पोलीस बंदोबस्त देण्याबाबत व परीक्षा केंद्रावर बंदोबस्तासाठी नियुक्त केलेल्या पोलीसांनी कोणत्याही प्रकारे गैरप्रकाराला उत्तेजन देऊ नये व परीक्षागृहात पोलीसांनी विनाकारण प्रवेश करू नये यासाठी योग्य ते आदेश आपले स्तरावर निर्गमित करावेत.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
मुंबई विभागीय मंडळ, वाशी, नवी मुंबई-400 703.
Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education,
Mumbai Divisional Board, Vashi, Navi Mumbai-400 703.

संवेदनशील केंद्रावर जादा पोलीस बंदोबस्त ठेवण्याबाबत आपले स्तरांवर आदेश निर्गमित व्हावेत ही विनंती. संवेदनशील केंद्रांची यादी सोबत जोडलेली आहे.

उच्च माध्यमिक इ. १२ वी व माध्यमिक शालांन्त इ. १० वी परीक्षेचे गोपनीय साहित्य जिल्हा निहाय परिरक्षण केंद्रावर (Custody) वितरीत करण्याच्या तारखांचा तक्ता सोबत जोडलेला आहे. जिल्हा निहाय नमूद दिनांकाच्या आदल्या दिवशी सर्व परिरक्षक केंद्रावर एक दिवस अगोदर पासून ते दि.१८/०३/२०२६ पर्यंत सशस्त्र पोलीस गार्डचा (१+३) बंदोबस्त उपलब्ध करून देण्यात यावा. तसेच संदर्भिय पत्र क्र. ०३ नुसार प्रत्येक सत्राच्या उत्तरपत्रिका पोस्टामार्फत परिरक्षक केंद्रावरुन संबंधित पोस्ट ऑफिस पर्यंत घेवून जाताना त्यासोबत पोलीस संरक्षण देण्यात यावे.

जे पोलीस गोपनीय साहित्य वाटप केंद्रावर (Custody Place) बंदोबस्तासाठी उपलब्ध असतील त्यांनी परिरक्षकांनी प्रश्नपत्रिकाच्या गोपनीय खोलीस सील केल्यानंतर प्रत्येक वेळी सील उघडणे व सील लावणे इ.बाबींची स्वतः समक्ष पाहून खात्री करावी व त्या प्रमाणे परिरक्षकाकडे असणाऱ्या रजिस्टरमध्ये वेळेची व तारखेची नोंद करुन स्वाक्षरी करावी. या बाबतच्या सूचना सर्व परिरक्षकांना देण्यात आलेल्या आहेत. (इ.१२ वी व इ. १० वी ची परीक्षा केंद्र यादी, वेळापत्रक व परिरक्षण केंद्र यादी सोबत जोडलेली आहे.) तरी याबाबत आपल्या स्तरावरुन सर्व संबंधित घटकांना आदेशीत करण्यात यावे, ही नम्र विनंती.

आपली विश्वासू,

Digitally signed by SHINDE JYOTSNA SANJAY
Date: 22-01-2026 18:39:49

विभागीय सचिव
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक
शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय मंडळ,
वाशी, नवी मुंबई ४००७०३

प्रत माहितीस्तव – १. मा. वि. सचिव, राज्यमंडळ, पुणे
२. विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई विभाग
३. शिक्षणाधिकारी (ठाणे, पालघर व रायगड) व
शिक्षण निरीक्षक (मुंबई दक्षिण, पश्चिम व उत्तर विभाग)